**ठाणे महानगरपालिका ठाणे**

**क्रिडा विभाग**

**जाहिर सुचना**

ठाणे महानगरपालिकेच्या वतीने क्रकेट खेळाचे खेळाडु दत्तक घेऊन पुरुष व्यावसायिक क्रिकेट संघाकरिता **फिटनेस ट्रेनर** यांच्या कडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

ठाणे महानगरपालिकेच्या मा महासभा ठरावानुसार क्रिडा विषयक बाबींना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टिने क्रिकेट या खेळाचे व्यावसायिक संघ तयार करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिका शहरातील उद्योन्मुख क्रिडापटुंना अधिकाधिक प्रोत्साहन देण्याच्या हेतुन ठाणे महानगरपालिकेच्या वतीने पुरुष क्रिकेट व्यावसायिक संघाकरिता फिटनेस ट्रेनर या पदाकरिता ११ महिन्यांच्या नेमणुकीसाठी कंत्राटी पध्दतीने खालील अटी व शर्तीस अधिन राहुन अर्ज मागविण्यात येत आहे.

अर्जदाराने खालील पात्रतेच्या अटींची पुर्तता केरणे आवश्यक आहे.

**पुढील ११ महिन्याकरीता ठोक मासिक मानधनावर करारपध्दतीने नेमण्यात येणाऱ्या फिटनेस ट्रेनरच्या नेमणूकीच्या अटी व शर्ती :-**

१. NIS (१ वर्षे/६आठवडे) फिटनेस कोर्स पूर्ण करणे आवश्यक आहे, किंवा खुल्या राष्ट्रीय स्पर्धेत फिटनेस ट्रेनर म्हणून काम केल्याचा कमीत कमी २ वर्षाचा अनुभवाचा दाखला.
२. संस्थेचे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित व्यक्ती बाबत असणे आवश्यक आहेत.
३. शासकीय किंवा निमशासकीय संघाबरोबर फिटनेस ट्रेनर पदावर (जिल्हा/विद्यापीठ/राज्य/व्यावसायीक संघ) काम केल्याचा कमीत कमी ३ वर्षे अनुभव असल्यास प्राधान्य.

**नेमण्यात येणाऱ्या फिटनेस ट्रेनर कर्तव्य व महत्वाच्या सुचना.**

१. फिटनेस ट्रेनर मुदतवाढ विहित नियमानुसार कंत्राटी/करार पद्धतीने प्रति महिना रु.२०,०००/- एकत्रित ठोक मानधनावर ११ महिन्यांच्या कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती असेल, त्यांना सेवेत कायमस्वरूपी करण्यासाठी दावा करण्याचा हक्क रहाणार नाही.
२. संघामधील फिटनेस ट्रेनरनी ठाणे महानगरपालिका संघा व्यतिरिक्त इतर कोणत्याही स्पर्धेत व वैयक्तिक स्तरावर सहभाग घेतल्यास संबंधित कालावधी विनावेतन करण्यात येईल.
३. खेळाडू शारिरीक दृष्टया उत्तम रहाण्यासाठी खेळाडूंना उत्तम शारिरीक प्रशिक्षण देणे फिटनेस ट्रेनरला बंधनकारक आहे.
४. सरावा दरम्यान प्रत्येक खेळाडू शिस्तीत व नियमानुसार फिटनेस करतो किंवा कसे? याबाबतची जबाबदारी फिटनेस ट्रेनरची असेल.
५. जर एखादा खेळाडू फिटनेस दरम्यान टाळाटाळ करत असेल, सतत गैरहजर रहात असेल, तर त्याचा त्या दिवसाबाबतचा अहवाल प्रशिक्षकास सादर करावा.

६. खेळाडूस सरावा दरम्यान अथवा स्पर्धेदरम्यान दुखापत झाल्यास फिटनेस ट्रेनर खेळाडू सोबत उपचारा दरम्यान उपस्थित राहणे बंधनकारक आहे.
७. जर खेळाडूंकडून फिटनेस ट्रेनर बद्दल कोणतीही तक्रार आल्यास सदर तक्रारीची शहानिशा करुन करारनामा रद्द करण्यात येईल.
८. सदर प्रकरणी कोणताही वाद उद्भवल्यास मा. आयुक्त सो. यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

उपरोक्त प्रमाणे पात्रता धारण करणाऱ्या उमेदवार यांनी १३/०६/२०२५, सायं, ०५.०० वाजेपर्यंत आपली व्ययक्तीक माहिती ,अनुभव व इतर प्रमाणपत्राच्या प्रमाणित छायांकित प्रतींसह, क्रिडा अधिकारी, दादोजी कोंडदेव क्रिडा प्रेक्षागृह , जवाहर बाग फायर ब्रिगेड रोड, ठाणे (प) या पत्यावर अर्ज सादर करावेत. अर्ज करताना लिफाफ्यावर प्रशिक्षक यांनी **ठाणे महानगरपालिका पुरुष क्रिकेट संघाकरिता फिटनेस ट्रेनर पदाकरिता नियुक्तीसाठी अर्ज केलेला आहे.** असे मोठ्या व ठळक अक्षरात नमुद करावे.

अर्ज करण्याचा कार्यालयाचा पत्ता खलीलप्रमाणे आहे.:
प्र.उप आयुक्त (क्रिडा):
दादोजी कोंडदेव क्रिडा प्रेक्षागृह
जवाहर बाग फायर ब्रिगेड रोड,
ठाणे (प.)

ठामपा/पिआरओ/क्रिडा/ ७११ /२०२५-२६
दि. ०३/१०/२०२५

सही/-
(मिनल पालांडे)
प्र.उप आयुक्त (क्रिडा)
ठाणे महानगरपालिका ठाणे